# पोलिसांचे डोळे उघडण्यासाठी आत्महत्येचा प्रयत्न

## फोंडा पोलिस ठाण्यासमोर मानसिकदृष्ट्या अस्वस्थ व्यक्तीचा थरारक 'नाट्यप्रयोग'

■ टीम दैनिक हेराल्ड




**फोंडा, दि. २४ :** फोंडा पोलिस ठाण्यासमोर मंगळवारी संध्याकाळी अतिशय तणावपूर्ण आणि प्रचंड नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली. पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यासाठी एका मानसिकदृष्ट्या अस्वस्थ वाटणाऱ्या व्यक्तीने ठाण्याच्या प्रवेशद्वाराजवळ पडलेल्या बेवारस केबल वायरचा वापर करून आत्महत्येचा प्रयत्न केला.

ही घटना सुमारे दहा मिनिटे सुरु होती. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत संबंधित व्यक्तीला वाचवले आणि ताब्यात घेतले. या घटनेने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले, कारण ती व्यक्ती केबल वायरने स्वत:चा गळा दाबण्याचा प्रयत्न करत होती.

ही केबल वायर पोलिस ठाण्याच्या प्रवेशद्वारावर विजेच्या खांबावरून खाली जमिनीवर गेल्या अनेक आठवड्यांपासून पडून आहे . पोलिसांच्या गाड्यांसह नागरिकही दररोज या वायरवरून जात होते. मात्र, कोणीही ती काढून टाकण्याची किंवा संबंधित केबल ऑपरेटरला ती योग्यरित्या उंचीवर बांधण्याच्या सूचना दिल्या नव्हत्या.

स्थानिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, जर पोलिस ठाण्याच्या दारातच अशा प्रकारे धोकादायक वायर पडू शकते आणि महिनाभर दुर्लक्षित राहू शकते, तर इतर ठिकाणांतील स्थिती काय असेल ? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत, पोलिस प्रशासन व केबल ऑपरेटर यांच्यावर दुर्लक्षाचा ठपका ठेवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ही वायर जर कोणा नागरिकाच्या डोक्यावर पडली असती, तर गंभीर इजा किंवा जीवितहानी होण्याची शक्यता होती.

फोंड्यातील रहिवासी आता या घटनेनंतर पोलिसांकडून तत्काळ उपाययोजना अपेक्षित करत आहेत. वायर तत्काळ हटवावी किंवा ती केबल विजेच्या खांबावर सुरक्षितरीत्या बांधावी. ही केवळ एक अपघाताची प्रतीक्षा करणारी गोष्ट आहे, असे एका नागरिकाने स्पष्टपणे सांगितले.

या घटनेमुळे सार्वजनिक ठिकाणी पडलेल्या, विसरलेल्या किंवा धोकादायक वस्तूंविषयी स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा आणि सेवा पुरवठादार कंपन्यांनी अधिक जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. जागरूकतेचा अभाव आणि दुर्लक्षामुळे अशी दुर्घटना घडू शकते, ज्याचे परिणाम गंभीर ठरू शकतात.




# शाळांमध्ये ड्रग्ज विरोधी धोरणाची तात्काळ अंमलबजावणी करा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २४ :** गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी अध्यक्ष पीटर एफ. बोर्जेस यांनी राज्य सरकारकडे सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये व्यापक ड्रग्ज विरोधी धोरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली आहे. तसेच शाळांमध्ये अंमली पदार्थांच्या वाढत्या वापरावर चिंता व्यक्त करत त्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अभाव आणि सरकारी उदासीनतेकडे लक्ष वेधले आहे.

बोर्जेस यांनी २०२५ च्या पहिल्या चार महिन्यांत गोव्यातील विविध कारवायांमध्ये ६८ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आल्याचा दाखला दिला. गोव्यात पुरवठ्यावर कारवाई होत आहे, पण प्रतिबंधक पातळीवरील प्रयत्न मर्यादित आणि प्रतिक्रियात्मक आहेत, असे ते म्हणाले.

त्यांनी नमूद केले की त्यांच्या कार्यकाळातगोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने शिक्षण खात्यासाठी तयार केलेले ड्रग्ज विरोधी धोरण अद्याप अधिसूचित झालेले नाही. हे धोरण शाळांना धोका असलेल्या विद्यार्थ्यांची ओळख, हस्तक्षेप, रेफरल आणि पुनर्वसन यासाठी सुसंगत मार्गदर्शन देईल, असे ते म्हणाले.

बोर्जेस यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या प्रहारी क्लबचा उल्लेख केला, जे विद्यार्थी–नेतृत्वाधारित ड्रग्ज विरोधी उपक्रम आहेत. पण सध्या या क्लबना शासनाकडून ना निधी आहे, ना प्रशिक्षण, ना कोणतीही देखरेख.

ते पुढे म्हणाले, या क्लबमध्ये मोठी क्षमता आहे, परंतु त्यासाठी राज्यस्तरीय पाठबळ आणि संस्थात्मक आधार आवश्यक आहे. शिक्षक विद्यार्थ्यांकडून ई–सिगारेट जप्त करतात, पण याविरोधात शाळांकडे कोणतेही स्पष्ट मार्गदर्शक तत्त्व नाहीत.

# वारसा स्थळावरील अनधिकृत बांधकाम ओल्ड गोवा पंचायत रोखणार ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४ :** ओल्ड गोवा ग्रामपंचायतीने ऐतिहासिक ' सेंट ऑगस्टीन टॉवर'च्या शेजारी अनधिकृतपणे सुरू असलेल्या बांधकामावर कडक पवित्रा घेत, संबंधित प्रकल्प प्रस्तावकाला तातडीने काम थांबवण्याचा आदेश दिला आहे. सदर प्रकरणात संबंधितांनी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता संरक्षित वारसा क्षेत्रात बांधकाम सुरू केल्याचा आरोप आहे.

ग्रामपंचायतीच्या सरपंच मेधा पर्वतकर यांनी या प्रकरणी संबंधित प्रस्तावकाला अधिकृत पत्र पाठवून बांधकाम तत्काळ थांबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, प्रभाग सदस्य अंबर आमोणकर यांच्या निदर्शनास ही बाब आली असून, सेंट ऑगस्टीन टॉवरच्या शेजारील भूखंडावर बेकायदेशीररित्या कुंपण घालणे आणि बांधकाम सुरू असल्याचे लक्षात आले आहे.

या जागेचा परिसर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय ) विभागाच्या संरक्षित क्षेत्रात मोडतो. त्यामुळे कोणतेही बांधकाम करण्यासाठी एएसआय व संबंधित अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक असते. यामुळे पंचायतीने प्रस्तावकाला नोटीस पाठवत तीन दिवसांच्या आत पंचायत कार्यालयात हजर राहून संपूर्ण अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. त्याचबरोबर बांधकामाच्या कायदेशीरतेसाठी सर्व संबंधित कागदपत्रांची मागणी केली आहे.

सरपंच पर्वतकर यांनी इशारा दिला आहे की, जर कागदपत्री पुरावे सादर करण्यात अपयश आले, तर संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे समजले जाईल आणि त्यानुसार कारवाई केली जाईल.

या प्रकरणावर सेव्ह ओल्ड गोवा कृती समिती आणि स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. समितीच्या सदस्यांनी सांगितले की, सदर बांधकाम प्रतिष्ठित सेंट ऑगस्टीन टॉवरच्या बफर झोनमध्ये येते आणि कोणतीही अधिकृत परवानगी न घेता ते सुरू करण्यात आले आहे.

कार्यकर्त्यांनी यावर गंभीर चिंता व्यक्त करत सांगितले की, या प्रकल्पासाठी आधीच काही झाडे तोडण्यात आली आहेत, हे पर्यावरणीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या चिंताजनक आहे. पुरातत्व वारशाच्या जवळ कोणतेही काम करण्यासाठी परवानगी घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे.

सदर प्रकरणाने गोव्यातील वारसा स्थळांभोवती होणाऱ्या अतिक्रमणावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे. पुरातन स्थळांभोवती विकासकामे करताना कायदेशीर प्रक्रिया पाळली जात आहे का, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक पंचायतीने यावेळी तत्काळ कारवाई केली असली, तरी अशा प्रकारच्या घटनांना रोखण्यासाठी पुढील काळात अधिक काटेकोर आणि पारदर्शक नियोजन आवश्यक आहे, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# सोनसोडोतील दुर्लक्षित रोपांमुळे 'शहरी वन' योजनेवर प्रश्नचिन्ह

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २४ :** मडगाव आणि फातोर्डा परिसरात सोनसोडो डंपिंग यार्डला शहरी वन' म्हणून विकसित करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेवर नागरिकांमध्ये नाराजी आणि संशयाचे वातावरण पसरले आहे. लावलेली अनेक रोपे कोरडी पडलेली असून देखरेखीअभावी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, असा आरोप स्थानिकांनी केला आहे.

या योजनेची घोषणा वनमंत्री विश्वजित राणे यांनी अलीकडेच केली होती. त्यांनी डंपिंग यार्डच्या भागात सुमारे ४०० झाडांची लागवड करून त्या परिसराचा हरित पुनरुज्जीवनाचा प्रकल्प हाती घेतल्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहणाऱ्या नागरिकांनी तिथे झाडांची संख्या आणि स्थिती यावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

साइटला भेट दिलेल्या नागरिकांनी सांगितले की, प्रत्यक्षात १००च्या आसपास रोपेच लावलेली दिसतात. त्यातील अनेक रोपे सुकलेली असून काही अजूनही प्लास्टिक पिशव्यांमध्ये आहेत. माती भरून नीट लावलेली नाहीत. काही झाडे रस्त्याच्या कडेला किंवा कचरा वर्गीकरणाच्या जागेवर पडलेली दिसतात. कोणतीही पाणीपुरवठा व्यवस्था किंवा झाडांची निगा राखण्याची व्यवस्था नाही.

बोर्डा येथील रहिवासी कस्टोडिओ फर्नांडिस म्हणाले, सैद्धांतिकदृष्ट्या ही योजना चांगली आहे. पण केवळ रोपे ठेवून निघून जाणे म्हणजे वृक्षारोपण नव्हे. यांना पाणी, सावली आणि निगराणीची आवश्यकता असते. तीच येथे पूर्णपणे दिसत नाही.

त्याचप्रमाणे मडगावचे रहिवासी फिलिप फर्नांडिस म्हणाले, जर सरकार खरोखरच सोनसोडोला शहरी वन' बनवू इच्छित असेल, तर त्यांना केवळ फोटोसेशनपुरते उपक्रम न करता सातत्याने देखभाल करावी लागेल. काही झाडे अजूनही पिशव्यांमध्ये पडून आहेत हे दुर्दैवी आहे.

प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी वनमंत्री स्वतः उपस्थित होते, त्यामुळे जनतेच्या अपेक्षा मोठ्या होत्या. मात्र त्यानंतर या झाडांची प्रत्यक्ष देखरेख, निगराणी किंवा व्यवस्थापन होतोय की नाही, याकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याची टीका होत आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, या उपक्रमांना जर नियमित पाठबळ मिळाले नाही, तर हे केवळ प्रतीकात्मकच ठरेल.

पर्यावरण प्रेमी आणि नागरिकांनी वन विभाग, मडगाव नगरपरिषद आणि स्थानिक पंचायतींकडे आवाहन केले आहे की त्यांनी त्वरित हस्तक्षेप करून रोपांना पाणी देणे, कुंपण घालणे आणि वेळोवेळी स्थितीची पाहणी करणे यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी.जर वेळेवर योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर सोनसोडोतील हे हरित स्वप्न' दुर्लक्षित रोपांसोबतच कोमेजून जाईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे .

केनरा बैंक Canara Bank — A Govt. of India Undertaking | सिंडिकेट Syndicate

**मडगाव शाखा (0314)**

**कब्जा सूचना (कलम 13(4)**

**(स्थावर मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी,
खाली सही करणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 ( 2002 चा 54 वा) खाली कॅनरा बँकेचा प्राधिकृत अधिकारी आहे आणि सदर कायद्याच्या कलम 13(12) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून त्याने सदर मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सदर सूचनेत दिलेल्या **रु. 3,72,45,502.74 (रु. तीन कोटी बहात्तर लाख पंचेचाळीस हजार पाचशे दोन व पैसे चौऱ्याहत्तर फक्त)** या रकमेची परतफेड करावी, अशी मागणी सूचना कर्जदार **मे. सायटेक एन्फोसोल्यूशन्स (इंडिया) प्रा. लि. (कर्जदार), श्री. संदिप सुभाष प्रभुदेसाई (भागीदार/हमीदार), श्रीमती जानवी संदिप प्रभुदेसाई (भागीदार/हमीदार), व श्रीमती सविता सुभा, प्रभुदेसाई (हमीदार)** यांना 10.04.2025 रोजी पाठवली होती.
कर्जदारांस या रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने कर्जदार व तमाम लोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्याने सदर कायद्याच्या कलम 13(4) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8 व 9 खाली त्यास/ तिला प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णिलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक **ताबा वर्ष २०२५ च्या जून मधील 23 व्या दिवशी** घेतला आहे.
खासकरून कर्जदार आणि तमाम लोकांना इशारा देण्यात येतो की त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि त्यांनी केलेला असा कोणताही व्यवहार कॅनरा बँकेस दि. 31/05/2025 रोजी देय असलेल्या **रु. 3,80,04,965.74/- (रु. तीन कोटी ऐंशी लाख चार हजार नऊशे पासष्ट व पैसे चौऱ्याहत्तर फक्त)** आणि त्यावर साठलेल्या चार्जेस व व्याजासहितच्या रकमेच्या भारास लागू होईल.
सदर मालमत्ता पुन्हा मिळवण्यासाठी उपलब्ध वेळेसंबंधी सदर कायद्याच्या कलम 13(8) कडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

गोवा राज्याच्या दक्षिण गोवा जिल्ह्याततालुका व नोंदणी उपजिल्हा सालसेतमधील मडगाव नगरपालिका हद्दीत फातोर्डाच्या चंद्रावाडो प्रभागात चोंरोवाडो या नावाच्या मोठ्या **स्थावर मालमत्तेचा अविभाज्य भाग** असलेल्या पोटविभागित प्लॉट क्र. 2 व 3 वरील मालमत्तेत बांधलेल्या संलग्न 101.14 चौ.मी. सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ व 87 चौ.मी. बिल्ट अप क्षेत्रफळाच्या एशियन कोस्टा पिनाकल या नावाच्या सदर बिल्डींगच्या दुसऱ्या मजल्यावरील 78.78 चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ऑफिस क्र. बी–203 व बी–204 या ऑफिसचा सर्व भाग. जी मालमत्ता खंड बी–84, नवीन मालिकेच्या क्र. 33215 खाली सालसेत भू नोंदणी कार्यालयात नोंदवलेली आहे व जी मालमत्ता अदमासे 8832 चौ.मी. क्षेत्रफळाची असून मडगाव शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. 26 च्या चलता क्र. 6 खाली मूळ सर्वेक्षित असून मडगाव शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. 26 च्या चलता क्र. 54 व 55 खाली सर्वेक्षित 941 चौ.मी. क्षेत्रफळाचा स्वतंत्र, वेगळा व अलग भाग असलेली मालमत्ता आहे जे कार्यालयमे. सायटेक इन्फो सोल्यूशन्स (इंडिया) प्रा. लि. यांचे मालकीचे आहे व सूर्या हॉटेल, फातोर्डा, मडगाव चे मागे ऑफिस क्र. बी–203 व बी–204 खाली एशियन कोस्ता पिनाकल दुसरा मजला येथे असून घर क्र.2/9423/ म्हणून ओळखले जाते व कर मूल्यमापन केलेले आहे आणि मडगाव नगरपालिकेच्या नोंदीत एक स्वतंत्र एकेरी युनिट म्हणून नोंदवल्याचे आढळून येते. आणि **चतु:सीमा पुढीलप्रमाणे : पूर्वेस :** हद्दीचा सेटबॅक, **पश्चिमेस :** ऑफिस क्र. बी–201 व बी–202., **उत्तरेस :** लिफ्ट वेल व जिना ब्लॉक, **दक्षिणेस :** हद्दीचा सेटबॅक.

**दिनांक : 23/06/2025**
**ठिकाण : मडगाव**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**

# प्रदूषणामुळे 'सांजाव' च्या आनंदाला खीळ

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २४ :** गोव्यातील पावसाळ्यात साजरा होणारा 'सांजाव'अर्थात सेंट जॉन द बॅप्टिस्ट उत्सव यंदा पारंपरिक विहिरी आणि तलावांऐवजी कृत्रिम टाक्यांमध्ये साजरा होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामागचे प्रमुख कारण म्हणजे जलस्त्रोतांचे वाढते प्रदूषण आणि त्यांची उपेक्षित स्थिती.

गोव्याच्या ख्रिस्ती समाजात २४ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या या उत्सवाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी तरुण मंडळी पारंपरिक फुलांचे फेटे घालून विहिरीत उड्या मारतात आणि पारंपरिक गाण्यांमधून आनंद व्यक्त करतात. ही प्रथा योहान बप्तिस्मा देणाऱ्याने येशूला जॉर्डन नदीत बाप्तिस्मा दिल्याच्या बायबलमधील प्रसंगावर आधारित आहे.

मात्र, अलीकडच्या काळात मडगाव परिसरातील बाणावली , राय, नुवे आणि इतर गावांमध्ये पारंपरिक विहिरींमध्ये उड्या मारण्याचे प्रमाण लक्षणीय घटले आहे. बाणावली मधील रहिवासी रोक फर्नांडिस म्हणाले की , एकेकाळी आम्ही 'सांजाव'साठी विहिरीत उड्या मारण्याची वाट पाहायचो. पण आता त्यात गढूळ पाणी असते आणि कधी रसायनांची दुर्गंधी देखील जाणवते.

राय येथील जेरॉन कोलासो यांचीही तीच खंत. ते म्हणाले, आमचे गाव एकेकाळी 'सांजाव' उत्सवासाठी प्रसिद्ध होते. विहिरींच्या भोवती लोक जमत आणि आनंदोत्सव साजरा करत. आता त्या विहिरी झाकलेल्या असतात आणि स्वच्छताही केली जात नाही. त्यामुळे आजारी पडण्याची भीती वाढली आहे.*

यामुळे अनेक ठिकाणी प्लास्टिक टाक्या, फुगवता येणारे कृत्रिम तलाव, पाण्याचे स्प्रे किंवा कृत्रिम पावसाची व्यवस्था करून उत्सव साजरा करण्याकडे लोक वळत आहेत. परंपरा जपण्याचा हा प्रयत्न असला, तरी तो मूळ सांस्कृतिक आणि पर्यावरणीय संदेशालाच हरवत असल्याची खंत अनेक जण व्यक्त करतात.

नुवेमधील विटोरिनो फर्नांडिस यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक आहे. ते म्हणाले, आपण केवळ एक उत्सव नाही, तर आपल्या पर्यावरणाशी असलेली नाळ तोडतो आहोत. 'सांजाव' आपल्याला स्वच्छ पाण्याचे महत्त्व सांगतो . केवळ सणासाठी नव्हे, तर जीवनासाठी.

यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी सरकारकडे पारंपरिक जलस्त्रोतांचे जतन आणि संवर्धन करण्याची मागणी केली आहे. त्यासाठी नियमित स्वच्छता मोहिमा, कचरा व्यवस्थापनाचे काटेकोर पालन आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. जरी कृत्रिम उत्सव तात्पुरती उर्जा आणि रंगत निर्माण करत असले, तरी 'सांजाव''च्या गाभ्यात असलेली पर्यावरणाशी नाळ जोडणारी भावना या बदलांमध्ये हरवत चालली आहे. त्यामुळे आता हा उत्सव केवळ आनंदोत्सव न राहता, पर्यावरण रक्षणासाठीच्या जागृतीचेही प्रतीक बनू लागला आहे.